I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** कडेगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0129 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/06/2024 16:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 21/05/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/05/2024

**Time From (वेळेपासून):** 15:21 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/06/2024 **Time (वेळ):** 16:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/06/2024 16:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगरपंचायत कार्यालय,कडेगाव,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** .

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): अमोल शिवाजी पाटील
(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :
(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1988
(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत
(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):
(f) Passport No.(पारपत्र क्र.):
Date of Issue (दिल्याची तारीख):
Place of Issue (दिल्याचे ठिकाण):
(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिवप्रभु शाळे जवळ, ,कडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिवप्रभु शाळे जवळ, ,कडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):
(j) Phone number (फोन नं.):
Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सागर रामचंद्र माळी | | | 1. साईनगरजवळ कडेगाव,, कडेगाव,,कडेगांव,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 06.06.2024

मी अमोल शिवाजी पाटील, वय 36 वर्ष, व्यवसाय:- व्यापार रा. शिवप्रभु शाळे जवळ, कडेगांव, ता.कडेगांव जि. सांगली. मो.नं. 7028617320

मी वरील ठिकाणी माझी आई श्रीमती सुनंदा, भाऊ प्रविण व सागर, भावजय ऐश्वर्या, पत्नी प्राची असे एकत्रात राहण्यास आहे. माझा भाऊ सागर शिवाजी पाटील यांनी मौजे कडेगांव हद्दीतील गट नं.250 क्षेत्र 2 गुंठे जमीन दुय्यम निबंधक कार्यालय कडेगांव येथे दि.29.12.2022 रोजी शंकर बजरंग राजमाने रा.पुणदी ता.पलुस जि. सांगली यांचेकडून साठेखत करुन खरेदी केली आहे. मार्च 2024 मध्ये सदर खरेदीचे माझे भावाच्या नावे गुंठेवारी नियमीतीकरण होण्यासाठी इंजिनिअर ओंकार मुळीक यांच्या मार्फत प्रस्ताव फाईल तयार करुन नियमीतीकरणाचा प्रस्ताव कडेगांव नगरपंचायत येथे जमा केला होता. माझा भाऊ सागर हा लेखा परिक्षक विभाग सांगली येथे नोकरीस असलेमुळे सदर प्रस्तावाचे कामाची पुर्तता करणेबाबत माझा भाऊ सागर याने मला सांगितले होते.

दि.20/05/2024 रोजी क्लार्क सागर माळी यांनी माझे भावाचे नावे खरेदी केलेल्या गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी माझ्याकडे 24,000/- रूपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत मी माझा भाऊ सागर याचेशी चर्चा केली. आम्हाला सागर माळी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 20.05.2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना संपर्क करून माझी सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कार्यालय, कडेगाव यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेचे कळविले होती. त्यावेळी पाटील साहेब यांनी दि.21.05.2024 रोजी कडेगाव एमआयडीसी येथे येत असल्याचे सांगून सदर ठिकाणी मला हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दि.21.05.2024 रोजी दुपारी 12.00 वा चे सुमारास पाटील साहेब यांनी मला संपर्क करून कडेगाव एमआयडीसी परिसरामध्ये येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील हिरो सीडी डिलक्स एमएच 10 बीडब्ल्यु 0326 वरून जावून पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी सोबत असले दोन सरकारी पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मी पाटील साहेब व दोन्ही पंचांना माझी श्री. सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कडेगाव यांचेविरुध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पाटील साहेब यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पाटील साहेब व दोन्ही पंचानी वाचून सहा केल्या. त्यानंतर एसीबी पथकाकडील पो.नि.पुजारी व स्टाफ असे शासकीय वाहनासह कडेगाव एमआयडीसी येथे आम्ही थांबलो ठिकाणी हजर झाले. पाटील साहेबांनी मला व पंचांना पो.नि.पुजारी व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनात बसलो. श्री. सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कडेगाव यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. श्रीनिवास विलास घोडके यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. राहुल राजु जेधे यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.21 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 घोडके असे माझेकडील मोटारसायकल वरून रवाना होवून नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथे जावून सागर माळी, क्लार्क यांची भेट घेवून त्यांचेशी आमचे प्रलंबित कामा संदर्भात चर्चा करू लागलो. त्यावेळी मी सागर माळी यांना " मग ती चलनाच किती, ते टोटल सांगा ते व्यवस्थित" असे म्हणालो असता सागर माळी यांनी मला "सांगितल की तुम्हाला मगाशी अठ्ठावीस काय तर सांगितले" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "अठ्ठावीस हजार" असे विचारले असता सागर



Scanned with OKEN Scanner

माळी यांनी "हा....सगळ मिळून चलनासहीत" असे म्हणून माझेकडे चलनासहीत 28,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी सागर माळी यांना "चलनाच मी अॅडजेस्ट करून आणलेत" असे म्हणालो. त्यावर सागर माळी यांनी मला "सही करत नाय" असे म्हणाले. त्यावर मी सागर माळी यांना " मग आता हे चलनाच सोडून तुम्हाला चोवीस हजार द्यायच हायत" असे म्हणालो असता सागर माळी यांनी "चोवीस हजार" असे म्हणुन चलनाचे सोडून स्वत:साठी 24,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर माझेत व सागर माळी यांचेमध्ये कामा संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी मी सागर माळी यांना " तासाभरात भावाकडनं हे करून देतो मग" असे म्हणून मी व पंच घोडके असे माझेकडील मोटार सायकलने नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.40 वा. बंद करून त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच धोडके यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉडींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी श्री.सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कडेगाव यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, श्री.सागर माळी, क्लार्क यांनी माझा भाऊ श्री. सागर पाटील यांनी खरेदी केलेल्या जमीनीची गुंठेवारी नियमितीकरण करून प्रमाणपत्र देणेसाठी माझेकडे एकुण 28,000/- रूपयांची मागणी करून त्यापैकी चलनाचे 4,000/- रूपये व स्वत:साठी 24,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झालेने पाटील साहेब यांनी सागर माळी यांचेविरूध्द नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथे लागलीच सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम हजर करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 48 नोटा असे 24,000/- रुपये पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पाटील साहेब यांनी सही केली. तसेच पाटील साहेब यांनी मला चलनाचे वेगळे 4,000/- रूपये सागर माळी यांनी मागणी केल्यानंतर देण्यास उपलब्ध आहे का? असे विचारले असता मी त्यांना चलनाचे वेगळे 4,000/- रूपये माझेकडे उपलब्ध असल्याचे सांगितले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.50 वाजता सुरू करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच घोडके असे माझेकडील मोटारसायकल वरून रवाना होवून नगरपंचायत कार्यालय, कडेगाव येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने नगरपंचायत कार्यालयाचे आवारात दाखल झाले. मी व पंच घोडके असे मोटारसायकल पार्क करून नगरपंचायत कार्यालया मध्ये गेलो. पाटील साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ कार्यालयाच्या आवारात सापळा लावून थांबलेचे दिसले. मी व पंच घोडके असे कार्यालयात जावून सागर माळी, क्लार्क यांची भेट घेतली. त्यावेळी सागर माळी यांनी मला "साईन करून पाठवल नाय तर त्यांनी.... शेंडगे साहेबांनी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आता ते सगळ व्याप करून आणलय तुम्ही जे चलनाचे चार हजार आणि चोवीस तुमचे चोवीस हजार" असे म्हणालो. त्यावर सागर माळी यांनी "ओसीवर सही करून पाठवल नाय त्यांनी अजुन" असे म्हणुन मला थोडा वेळ बसण्यास सांगितलने. त्यानंतर माझे परिचियाचे डोंगरे कॉन्ट्रॅक्टर हे कार्यालयामध्ये आले व ते माझेशी कामा संदर्भात चर्चा करू लागले.

त्यानंतर मी सागर माळी यांना "बर कस काय करायच" असे विचारले असता सागर माळी यांनी मला "शेंडगे साहेबांची सही राहिली असल्याचे सांगून शेंडगे साहेबांनी एक क्युरी सांगितली असल्याचे सांगून त्यांनी सोळा हजार सांगितले मी आठ हजार रूपये दिले" असे म्हणून मला "सकाळी मी किती म्हंटले चोवीस" असे विचारले त्यावर मी त्यांना "चोवीस हजार" असे म्हणून "पावतीच किती?" असे विचारले. त्यावर सागर माळी यांनी मला "पावतीच चार हजार दोनशे एॅशी म्हणजे तिनशे" असे म्हणून "त्यान काय सांगितल, मला करा म्हणले... त्या शिवाय सही करणार न्हाय" असे म्हणाले. त्यानंतर मी सागर माळी यांना "बर मग आता तुमच आणलेत, तेज जे अॅडजेस्टमेंट करून बँकेत गेला होतो म्हणून म्हंटलो लागलच पेड करून टाकायच, दिवून टाकतो विषय मला फक्त पत्र कधी मिळणार ऑर्डर ते" असे विचारले. त्यावर सागर माळी यांनी मला "उद्या सकाळी" असे म्हणाले. त्यावेळी तेथे हजर असणारे डोंगरे कॉन्ट्रॅक्टर यांनी मला "उद्या सकाळी साहेबांची सही झाली की तुम्हाला प्रमाणपत्र आणि ले आऊट मिळणार" असे म्हणाले. त्यावेळी सागर माळी यांनी मला "ओसी कॉपी पाठविले आहे सीओ साहेबांना" असे म्हणाले. त्यानंतर मी सागर माळी, क्लार्क यांना चलनाची पावती काढून देणेची विनंती केली. त्यावर डोंगरे कॉन्ट्रॅक्टर



Scanned with OKEN Scanner

यांनी मला "सकाळी पावती पण तुम्हाला देतो आणि परवाना पण आणि सगळच देतो" असे म्हणाले. त्यावर मी डोंगरे कॉन्ट्रॅक्टर यांना "चालतय मग सकाळी द्या आता.... येतो मग सकाळी तयार करून एकदमच द्या सेट मध्ये" असे म्हणून सागर माळी यांना किती वाजता येवू असे विचारले असता सागर माळी यांनी "आकरा नंतर या की कधीपण" असे म्हणालेने मी व पंच घोडके असे नगरपंचायत कार्यालयामधून बाहेर येवून मोटारसायकलवरून कडेगाव ते कराड रोडने रवाना झालो. लागलीच पाटील साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ आले. पाटील साहेब यांनी मला मोटारसायकल थांबविणेचा इशारा केल्याने मी रोडकडेला मोटार सायकल थांबविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 17.29 वाजता बंद करुन ताबेत घेतला. त्यानंतर आम्ही सर्व तेथून रवाना होवून कडेगाव एमआयडीसी येथे दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच घोडके यांना त्यांचे वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला व पंच घोडके यांना सापळा कारवाईची हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत सापळा कारवाईमध्ये श्री. सागर माळी यांनी मला लाच स्विकारण्याच्या हेतूने नगरपंचायत कार्यालय कडेगंाव येथे बोलावून घेवून माझेशी 24,000/- रूपये लाच रक्कम रक्कमेबाबत व चलनाचे 4,300/- रूपये बाबत चर्चा केली परंतू श्री. सागर माळी यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारली नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच सागर माळी यांनी मला दि.22.05.2024 रोजी सकाळी 11.00 वा नंतर गंुठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र घेणेसाठी पुन्हा बोलविले असल्याने पाटील साहेब यांनी सागर माळी, क्लार्क यांचेविरूध्द दि.22.05.2024 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून सापळा कारवाई तात्पूरती मागे घेण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यावेळी मी पाटील साहेब यांना सांगितले की, दि.22.05.2024 रोजी माझे महत्वाचे काम असल्याने मी बाहेरगावी जाणार आहे. त्यामुळे पाटील साहेब यांनी मला मी त्यांना संपर्क केलेनंतर सागर माळी यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला अॅंथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम बदलुन देवून मला कारवाईबाबत गोपनीयता राखंणेच्या व श्री.सागर माळी यांनी मला संपर्क केल्यास आम्हास कळविणेबाबत आवश्यक सुचना दिल्या.

दि. 24.05.2024 रोजी मी पाटील साहेब यांना संपर संपर्क करून, मी नगरपंचात कार्यालय कडेगाव येथे गुंठेवारी प्रमाणपत्राचे चौकशी करता जाणार असल्याचे सांगून आजरोजी सागर माळी, क्लार्क हे माझेकडे लाच रक्कम मागणी करून स्विकारतील अशी शक्यता वाटत असलेबाबत कळविले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ते कडेगाव एमआयडीसी येथे येत असलेचे सांगून मला लाच म्हणून द्यावी लागणारी रक्कम व चलनाची वेगळी रक्कम घेवून हजर राहणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे 14.00 वा चे सुमारास पाटील साहेब, सापळा पथकसह कडेगाव एमआयडीसी परिसरात आलेनंतर पाटील साहेब यांनी मला संपर्क केलेनंतर मी पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी मी पाटील साहेब यांना सांगितले की आजरोजी मी लोकसेवक श्री.सागर माळी, क्लार्क यांची नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथे जावून भेट घेवून आमचे कामा संदर्भात चर्चा करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला व पंच घोडके यांना नगरपंचायत कार्यालय, कडेगाव येथे सागर माळी, क्लार्क यांचेकडे पाठवून सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम हजर करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 48 नोटा असे 24,000/- रुपये पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच व पाटील साहेब यांनी सही केली. तसेच पाटील साहेब यांनी मला चलनाचे वेगळे 4,300/- रूपये सागर माळी यांनी मागणी केल्यानंतर देण्यास उपलब्ध आहे का? असे विचारले असता मी त्यांना चलनाचे वेगळे 4,300/- रूपये माझेकडे उपलब्ध असल्याचे सांगितले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यांनंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.39 वाजता सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच घोडके असे माझेकडील मोटारसायकल वरून रवाना होवून नगरपंचायत कार्यालय, कडेगाव येथे दाखल झालो. माझे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने नगरपंचायत कार्यालयाचे आवारात दाखल झाले. मी व पंच घोडके असे मोटारसायकल पार्क करून नगरपंचायत कार्यालया मध्ये गेलो. पाटील साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ कार्यालयाच्या आवारात सापळा लावून थांबलेचे दिसले. मी व पंच घोडके असे कार्यालयात जावून



Scanned with OKEN Scanner

सागर माळी, क्लार्क यांची भेट घेतली. त्यावेळी मी सागर माळी क्लार्क यांचेसमोर जावून "काय झाल पत्राच" असे विचारले असता सागर माळी यांनी मला "साईन झालय सगळया.....चलन पण केलेय त्याच" असे म्हणून माझेशी चलनाचे रक्कमेबाबत चर्चा करू लागले. त्यावेळी मी सागर माळी यांना " तुम्ही सांगितलेल आणलेत.....तेवढ त्यातल काय तुम्ही सांगितलेल देवू देत" असे विचारले असता सागर माळी यांनी मला "न्हाय... द्यायचा काय विषयच न्हाय ना" असे म्हणून मला चलनाचे पैसे कार्यालयातील एका कर्मचारी यांचेकडे भरणेस सांगितली. त्याप्रमाणे मी माझेकडील चलनाचे वेगळे ठेवलेल्या पैशामधून एकुण 4,280/- रूपये सदर कर्मचारी यांचेकडे भरले. त्यानंतर सागर माळी यांनी मला चलनाच्या दोन पावत्या, गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र, ले आऊट नकाशा दिला. त्यावेळी मी सागर माळी यांना "माळी साहेब येवू का मग" असे विचारून मी व तक्रारदार असे कार्यालयातून बाहेर येवून मोटार सायकलवरून कडेगाव ते कराड रोडने रवाना झालो. लागलीच पाटील साहेब व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ आले. पाटील साहेब यांनी मला मोटारसायकल थांबविणेचा इशारा केल्याने मी रोडकडेला मोटार सायकल थांबविली. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 16.07 वाजता बंद करून ताबेत घेतला. त्यानंतर आम्ही सर्व तेथून रवाना होवून कडेगाव एमआयडीसी येथे दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच घोडके यांना त्यांचे वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला व पंच घोडके यांना सापळा कारवाईची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

एकंदरीत सापळा कारवाईमध्ये मी व पंच नं.1 घोडके असे श्री.सागर माळी, क्लार्क यांची नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथे जावून भेट घेतली असता, सागर माळी, क्लार्क यांनी मला गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्रासाठी चलनाची फी 3210/- रूपये व 1070/- रूपये अशी एकुण 4,280/- रूपये शुल्क भरून घेवून चलनाची पावती देवून गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र व ले आऊट नकाशा दिला आहे. परंतू श्री. सागर माळी यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारली नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी सापळा कारवाई मागे घेण्याचे सर्वानुमते निश्चित करून मला अ◌ॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम बदलून दिलेली आहे. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला सदर कारवाई बाबत गोपनियता राखणे◌े बाबत सुचना देवून श्री.सागर माळी, क्लार्क यांचा निरोप आल्यास संपर्क करणेबाबत सुचना दिल्या. त्यावेळी मी पाटील साहेब यांना पंचांसमक्ष सांगितले की, "श्री.सागर माळी, क्लार्क यांनी माझा भाऊ सागर पाटील यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र व ले आऊट नकाशा दिलेला असून आता ते माझ्याकडे सदर प्रमाणपत्रासाठी लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारतील याची शक्यता वाटत नसल्याचे सांगून, श्री. सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कडेगाव यांनी त्यांचा भाऊ सागर पाटील यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र देणेसाठी 24,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरूध्द कारवाई व्हावी" असे सांगितल्याने पाटील साहेब यांनी माझा लेखी जबाब दोन्ही पंचासमक्ष नोंदवून घेतला आहे. त्यावेळी मी आपणासमक्ष सागर माळी, क्लार्क यांनी दिलेली चलनाच्या 2 पावत्या, गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र व ले आऊट नकाशा इ. कागदपत्रे हजर केलीत.

लोकसेवक श्री. सागर माळी, क्लार्क नगरपंचायत कार्यालय कडेगाव यांनी माझा भाऊ सागर पाटील यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र देणेसाठी स्वत: करीता 24,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पाटील साहेब यांनी लोकसेवक सागर माळी, क्लार्क यांचेवि◌ारूध्द नगरपंचायत कार्यालय कडेगाव येथे सापळा कारवाई आयोजित केली असता सागर माळी, क्लार्क यांनी माझ्याकडून लाच रक्कम स्विकारली नाही.

तरी दि. 21.05.2024 रोजी 15.21 वा ते 15.40 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सागर रामचंद्र माळी, वय-32 व्यवसाय-लिपीक कडेगाव नगरपंचायत कडेगाव, वर्ग-3, सध्या रा. मिलींद सन्ने यांचे घरी भाडयाने, साईनगरजवळ कडेगाव, मुळ रा. माळवाडी, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझा भाऊ सागर पाटील यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र देणेसाठी स्वत: करीता माझेकडे 24,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याने माझी लोकसेवक श्री.सागर रामचंद्र माळी, वय-32, लिपीक कडेगाव नगरपंचायत कडेगाव, वर्ग-3, सध्या रा. मिलींद सन्ने यांचे घरी भाडयाने, साईनगरजवळ कडेगाव, मुळ रा. माळवाडी, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यांचेविरुध्दकायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं◌्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Vinay Ramchandra Bahir(I (Inspector)) / DGPVRBM7405 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्रं.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Asgabi

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vinay Ramchandra B
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPVRBM7405

पोलीस स्टेशन ऑफिसर
कोरेगांव पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner